मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि.२२/०९/२०२६

***सुप्रसिद्ध व्याख्याते व AI तज्ज्ञ चिन्मय गव्हाणकर यांचे 'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि गतिमान प्रशासन' या विषयावर विशेष व्याख्यान संपन्न***
***वसई-विरार शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराबाबत मोलाचे मार्गदर्शन***

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) तसेच गतिमान आणि परिणामकारक प्रशासनाच्या विविध पैलूंची माहिती मिळावी, यासाठी मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या संयोजनाने आयोजित 'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि गतिमान प्रशासन' या विषयावर सुप्रसिद्ध व्याख्याते व नामवंत AI तज्ज्ञ श्री.चिन्मय गव्हाणकर यांचे विशेष व्याख्यान दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात संपन्न झाले.
बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा दैनंदिन कार्यालयीन कामकाजात, प्रशासकीय प्रक्रियांमध्ये तसेच नागरिकाभिमुख सेवा अधिक गतिमान, सुलभ आणि परिणामकारक करण्यासाठी कशाप्रकारे उपयोग करता येऊ शकतो, याबाबत ते मार्गदर्शन त्यांनी केले. महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणावर कागदपत्रे, नोंदी, अहवाल, अर्ज, पत्रव्यवहार, विविध प्रकारची माहिती तसेच नागरिकांशी संबंधित सेवा हाताळल्या जातात. अशा परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य पद्धतीने वापर केल्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांचा वेळ व श्रम वाचविणे, माहितीचे व्यवस्थापन अधिक सुसूत्र करणे, पुनरावृत्तीची कामे कमी करणे आणि निर्णय प्रक्रियेसाठी आवश्यक माहिती अधिक वेगाने उपलब्ध करून देणे शक्य होऊ शकते, हे त्यांनी उदाहरणांद्वारे स्पष्ट केले.

व्याख्यानादरम्यान AI च्या माध्यमातून दैनंदिन कार्यालयीन कामकाजामध्ये करता येणाऱ्या विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पत्रे व मसुदे तयार करणे, अहवालांचे संक्षिप्तीकरण, मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण, आवश्यक माहिती शोधणे, विविध स्वरूपातील मजकुराचे रूपांतर, सादरीकरणासाठी आवश्यक माहिती तयार करणे तसेच नियमित आणि पुनरावृत्तीची कामे अधिक कार्यक्षम पद्धतीने हाताळणे यांसारख्या बाबींमध्ये AI चा वापर कशा पद्धतीने करता येऊ शकतो, याचे प्रात्यक्षिक स्वरूपातील मार्गदर्शन करण्यात आले.

महानगरपालिकेच्या विविध सेवा नागरिकांपर्यंत अधिक जलद, सुलभ आणि परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. नागरिकांच्या तक्रारी, अर्ज, सेवा विनंत्या आणि उपलब्ध माहितीचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी डिजिटल प्रणाली व AI आधारित साधनांचा सुयोग्य वापर करता येऊ शकतो. यामुळे नागरिकांना आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध होण्यास तसेच प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ होण्यास मदत होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

AI हे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निर्णयक्षमतेला पर्याय नसून त्यांना अधिक सक्षम करणारे साधन म्हणून वापरणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. AI कडून मिळणारी माहिती वापरताना तिची अचूकता पडताळणे, गोपनीय व संवेदनशील माहितीची योग्य काळजी घेणे, माहितीच्या सुरक्षिततेचे भान ठेवणे तसेच तंत्रज्ञानाचा नैतिक आणि जबाबदार वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि बदलत्या डिजिटल युगाशी प्रशासनाला अधिक सक्षमपणे जोडणे, या व्यापक उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे व्याख्यान उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरले.
या व्याख्यानावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, प्र.शहर अभियंता श्री.प्रदीप पाचंगे, परिवहन व्यवस्थापक श्री.धेर्यशील जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.विकास सावंत, नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर, सर्व सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.